3 (196)

# व्यवस्थापन परिषदेची दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| १. | **दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**<br>**९ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मंजूर करण्यात आले :-** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | १) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, १२ वी ओळीतील "be accepted" नंतर " subject to no dues certificates from Affillation Section" असे वाचावे. | संलग्नता व मान्यता |
| ठराव | २) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, १६ व्या ओळीतील "within a month", नंतर " persmisson for shifting be given after confirmation of payment of all dues,." असे वाचावे. | संलग्नता व मान्यता/ वित्त व लेखा |
| ठराव | ३) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, २४ व्या ओळीतील "Dr. Jorge Jose" च्या ऐवजी "Dr. Jose George" असे वाचावे. | शि. नि. व मा. विभाग(वि.शि.) |
| कार्यवाही | सुधारित ठराव संबंधित विभागांना पाठविण्यात आले. | |
| | **दिनांक ९ जुलै, २०१८ रोजीच्या इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित झाले :-** | |
| ठराव | १) बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदला संदर्भात No Dues Certificate 2011 पासून दिलेले आहे; तेव्हा बिर्ला महाविद्यालयाबाबत No Dues Certificate हे संलग्नता विभागाने महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून देण्यात यावे. | संलग्नता व मान्यता विभाग |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | संलग्नता विभागाने पत्र क्र. AFF/ICD/2018-19/1689 dt. 20 November, 2018 नुसार बिर्ला महाविद्यालयाच्या स्थापने पासून महाविद्यालयांने विद्यापीठात जमा केलेल्या शुल्काची वर्ष निहाय (पावती सहित) माहिती मागविण्यात आलेली आहे.<br>तसेच पत्र क्र. AFF/ICD/2018-19/2186 dt. 28 January, 2018 नुसार<br>१) संलग्नता विभागाकडून बिर्ला महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांका पासून आज पर्यंत किती येणे (Dues) बाकी आहे. या संदर्भात पत्र व्यवहार करण्यात आला आहे. (प्रत संलग्न)<br>२) बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदलाबाबत संलग्नता विभागाकडून कार्यवाही करण्यात आली. (प्रत संलग्न) | |
| ठराव | २)मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क येणे बाकी आहे, त्यांच्या वसुली संदर्भात तात्काळ संलग्नता विभाग, कुलगुरू, कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करून व्यवस्थापन परिषदेच्या निणर्यानुसार संबंधीत महाविद्यालयांना त्वरीत पत्र पाठवावयाची कार्यवाही सुरू करावी. तद्वतच याबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त तक्रारींवर निर्णय घेण्याकरिता व यानुषंगाने उर्वरित महाविद्यालयां संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत समिती गठीत करण्यात यावी व या प्रकरणाचे संपुर्ण पुनरावलोकन करून | वित्त व लेखा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करावा. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | संलग्नता विभागाने पत्र क्र.संलग्नता/ आयसीडी/२०१८-१९/ १७०२ दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी संबंधित महाविद्यालयांना वसूली बाबत पत्र पाठविले आहे.<br>तसेच पत्र क्र. AFF/ICD/2018-19/2186 dt. 28 January, 2018 नुसार<br>मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांना संलग्नता शुल्काची मुळ रक्कम व दंडाची वसुली करण्याकरीता पत्र पाठविण्यात आलेली आहेत.<br>मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार महाविद्यालयांकडून थकबाकी रक्कमेबाबत अद्याप कोणती ही तक्रार प्राप्त झालेली नाही.<br>मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार महाविद्यालयांकडून रू.८६,०५,८६९/-रक्कम जमा झाली आहे. (प्रत संलग्न) | |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | वित्त व लेखा विभागाने परिपत्र क्र.एफएओ/आसीडी/१८-१९/१ दिनांक २४ डिसेंबर, २०१८ नुसार महाविद्यालयांना प्रलंबित शुल्क भरण्या विषयी सुचीत केले आहे. | |
| ठराव | ३) ऑल इंडिया टेनिस कोर्ट (AITA) च्या सामंजस्य करार (एम.ओ.यू) च्या अनुषंगाने फी न देणे, अशा विविध तक्रारी श्री. प्रदिप सावंत यांनी मांडल्या. तसेच इतरही सामंजस्य करार (एम.ओ.यू) आहेत त्यांचे नुतनीकरण करावयाचे असल्यास त्याबाबत पुनरावलोकन करण्यासाठी समिती गठित करण्यात यावी. समिती सदस्यांचे नाव सूचविण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | विद्याविषयक नियोजन व विकास विभाग/ विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष |
| विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने केलेली कार्यवाही | समितीची नावे सुचविण्यासाठी मा. कुलगुरूंकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजी टिप्पणी सादर करण्यात आली व समितीवर नियुक्त केलेल्या सर्व सदस्यांना पत्र क्र.APD/595/2018-19/485 दिनांक २७ डिसेंबर, २०१८ नुसार कळविण्यात आले आहे. तसेच पत्र क्र. APD/595/2018-19/556 दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ नुसार समिती सदस्यांना समितीची सभा दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोजित केल्याचे पत्र पाठविले आहे. | |
| ठराव | ४)Mumbai School of Economics & Public Policy यांचे विविध करार झाले त्याबाबत गठीत समितीने दिलेल्या अहवालाप्रमाणे कायदेशीर तपासणी करून घेण्यात यावी. यासंदर्भात विद्यापीठावर कुठलाही आर्थिक भार येणार नाही असे कलम करारात अंतर्भुत करण्यात यावेत. तसेच कराराअन्वये काही मतभेद झाल्यास लवादाचे (आरबिट्रेशन) स्थान मुंबई असावे. | Mumbai School of Economics & Public Policy |
| Mumbai School of Economics & Public Policy विभागाने केलेली कार्यवाही | ORF बाबत स्वतंत्र बाब व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ च्या बैठकीत बाब क्र. ८ अन्वये ठेवण्यात आली व बाब मंजुर करण्यात आली. | |
| बाब: २ | **दिनांक १४ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |

| | | |
|---|---|---|
| <u>ठराव</u> | दिनांक १४ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| <u>बाब: ३</u> | **<u>दिनांक २५ एप्रिल, २०१८ व २३ मे, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल सादर.</u>** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| <u>ठराव</u> | असा ठराव करण्यात आला की, दिनांक २५ एप्रिल, २०१८ व २३ मे, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| | कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील ठराव पारीत झाले. | |
| | १) व्यवस्थापन परिषदेच्या दि. २५/०४/२०१८ बाब क्र.४ बाबत पारीत झालेल्या ठरावावर समितीच्या अहवालानुसार किती शिफारशींवर अंमलबजावणी केली, याबाबत माहिती देण्यात यावी. | संलग्नता व मान्यता विभाग |
| <u>संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही</u> | संलग्नता विभागाने पत्र क्र. AFF/ICD/2018-19/1688 dt. 20th November, 2018 अन्वये सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे तासगावकर महाविद्यालयाला कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली. सोबत प्रत जोडली आहे. | |
| <u>ठराव</u> | २) अस्थाई सुरक्षा रक्षकांना व्यवस्थापन परिषदेच्या १८.०२.२०१४ नुसार देण्यात येणारा अतिरिक्त भत्ता व २५.०४.२०१८ बाब क्र.९ नुसार गणवेश व विविध सुरक्षा रक्षकांच्या वेतनातील फरक यावर निर्णय घेण्याकरिता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. समितीचा निर्णय व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा, असेही ठरले. | सामान्य प्रशासन/ सुरक्षा विभाग |
| <u>सामान्य प्रशासन विभागाने केलेली कार्यवाही</u> | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र.GAD/ICM/2018-19/823 dt. 20 October, 2018 नुसार गणवेशासाठी खाकी टेरीकॉट कापडाचे कटपीस पूरविण्याबाबत महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉपोरेशन लि. या कंपनीला कळविले आहे. सविस्तर माहिती पत्रात नमुद केली आहे.<br>तसेच पत्र क्र.GAD/ICM/2018-19/903 dt. 6 November, 2018 नुसार Pilot Clothing Co. ला आर्म ब्रॅजेस् पुरविण्याबाबत कळविले आहे.<br>तसेच पत्र क्र.GAD/ICM/2018-19/981 dt. 27 November, 2018 नुसार वरिल बाबत कार्यवाही झाल्याचे कागदपत्र सोबत जोडले आहे. | |
| <u>सुरक्षा विभागाने केलेली कार्यवाही</u> | सुरक्षा विभागाने पत्र क्र. S.O./01/-/2019 दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असे कळविले. सदर समितीची बैठक दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता संपन्न झाली. तसेच दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रा नुसार हंगामी सुरक्षा रक्षकांना गणेवश देण्यात आला आहे. तसेच अतिरिक्त कामाचा भत्ता वाढीव दराने देण्याची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे, असे कळविले आहे. | |

| | | |
|---|---|---|
| <u>ठराव</u> | ३)व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावर कार्यवाही का केली जात नाही, कार्यवाही न करण्यामागील जे-जे दोषी आहेत त्यावर निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात यावे. समितीने सादर केलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा, असेही ठरले. | सुरक्षा विभाग |
| <u>सुरक्षा विभागाने केलेली कार्यवाही</u> | सुरक्षा विभागाने पत्र क्र. S.O./01/-/2019 दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असे कळविले. सदर समितीची बैठक दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता संपन्न झाली. | |
| <u>ठराव</u> | ४)३० ते ४० सुरक्षा रक्षक ज्यांची तीन ते चार महिन्यापूर्वी नियुक्ती केलेली आहे व ज्यांना रू. २२,६०० वेतन मिळते त्यांच्या सेवा पुन्हा न घेता त्यांच्या सेवा खंडीत करून जे सुरक्षा अधिकारी १० ते २० वर्षा पासून काम करतात, त्यांना सेवेत घेण्यात यावे, असे तत्वत: मान्य करण्यात आले. तसेच या सुरक्षा रक्षकांच्या सेवा खंडीत करण्याअगोदर सर्व सुरक्षा रक्षकांचे सेवा नियम, नियुक्तीच्या शर्ती व अटी, या निर्णयामुळे होणाऱ्या कायदेशिर बाबी, न्यायालयातील प्रकरणे, मागील वेतन परतावा, विद्यापीठावर येणारा आर्थिक भार या सर्व बाबींचा अभ्यास करून त्यांना सेवेत घेण्याबाबत निर्णय घेण्याकरिता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | सुरक्षा विभाग |
| <u>सुरक्षा विभागाने केलेली कार्यवाही</u> | सुरक्षा विभागाने पत्र क्र. S.O./01/-/2019 दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असे कळविले. सदर समितीची बैठक दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता संपन्न झाली. | |
| <u>ठराव</u> | **५) प्र-कुलगुरूंना त्यांचे निवासस्थान देण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.** | सा. प्रशासन विभाग/ विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष |
| <u>सामान्य प्रशासन विभागाने केलेली कार्यवाही</u> | सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.GAD/ICM/2018-19/888 ५ नोव्हेंबर, २०१८ नूसार विद्यापीठ अभियंता यांना मरीन लाईन्स येथील प्र-कुलगुरूंच्या निवास स्थानाची दुरूस्ती करण्याबाबत कळविले आहे. | |
| <u>विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष यांना केलेली कार्यवाही</u> | विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष यांनी पत्र क.युई/३४/१०७८/२०१९ दि. २८ जानेवारी, २०१९ नुसार प्र-कुलगुरूच्या निवास स्थानाचे संरचना तपासणी (Stuctural Audit) करून अंदाज पत्रक सादर करण्यासाठी V.J.T.I. या संस्थेस नियुक्त केले या नुसार V.J.T.I. संस्थेने संरचना तपासणी करून अंदाज पत्रक तयार केले व ही बाब बांधकाम समिती पुढे दि. ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी सादर केली. त्यानंतर बांधकाम समितीने सदरच्या निवासस्थानाला स्लॅब करता येईल का यांची तपासणी करण्यास सांगितले. त्यायोगे दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी V.J.T.I. संस्थेने इमारतींची स्थिती पाहता स्लॅब टाकणे योग्य नाही असा अहवाल दिला. | |

| | | |
|---|---|---|
| **बाब: ४** | **महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांनी विद्यापीठ फोर्ट विभागामध्ये सांयकाळी व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष (Lecture Rooms) उपलब्ध करून देण्याबाबत गठित करण्यात आलेल्या समितीचा अहवाल.** | सामान्य प्रशासन विभाग |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की; महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांना विद्यापीठ फोर्ट विभाग परिसरामध्ये सांयकाळी ४ ते ८ या कालावधीत व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. दिपककुमार मुकादम व डॉ रश्मी ओझा यांनी दि. ११ जून, २०१८ रोजी सादर केलेला अहवाल मान्य करण्यात आला.<br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, प्रशासकीय स्तरावर व्याख्यान कक्ष देण्याबाबत व्यावसायिक दराने भाडे ठरविण्यासाठी व्यवस्थापन परिषदे समक्ष स्वतंत्र बाब ठेवण्यात यावी. | |
| **सामान्य प्रशासन विभागाने केलेली कार्यवाही** | सामान्य प्रशासन विभागाने पत्र क्र.GAD/ICM/2018-19/894 ५ नोव्हेंबर, २०१८ नूसार कक्ष क्र.१४२-अ व ब महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ यांना व्याख्यान घेण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत उपकुलसचिव विद्याविषयक प्राधिकरणे विभागास कळविल्याचे या विभागास कळविले आहे.<br>तसेच पत्र क्र.GAD/ICM/2018-19/1052 ७ डिसेंबर, २०१८ नूसार विद्यापीठ अभियंता यांना पुढील कार्यवाही बाबत पत्र पाठविले आहे. | |
| **बाब: ५** | **भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१८करीता निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून एका सदस्याची नेमणूक करण्याबाबत.** | शिष्यवृत्ती विभाग |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१८ साठी निकषानुसार बक्षीस पात्र विद्यार्थ्याला सुवर्ण पदक देण्याकरिता समिती सदस्यांची निवड व समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेतील एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| **शिष्यवृत्ती कक्ष यांनी केलेली कार्यवाही** | शिष्यवृत्ती विभागाने पत्र क. Sch./880/2019 दि. ११ फेब्रुवारी, २०१९ आणि पत्र क. Sch./2228/2019 दि. २२ मार्च, २०१९ नुसार अधिष्ठाताकडून विद्यार्थ्यांची नावे देण्यासाठी परिपत्रक निर्गमित केले असून अद्यापं पर्यंत एक ही विद्यार्थ्यांचे नाव प्राप्त झालेले नाही. | |
| **बाब: ६** | **सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स व समकक्ष पदांना रु. ९३००-३४८०० ऐवजी रू. १५६००-३९१०० इतके वेतन बँड व ग्रेड वेतन ५४०० मिळणेसाठीचा प्रस्ताव.** | आस्थापना विभाग १/३, २/४ |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स व समकक्ष पदांना रु. ९३००-३४८०० ऐवजी रू. १५६००-३९१०० इतके वेतन बँड व ग्रेड वेतन ५४०० मिळणेसाठीचा प्रस्ताव खालील माहितीसह सादर करण्यात यावा.<br>१) याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल.<br>२) सदर कर्मचाऱ्यांची मुळ नियुक्ती कोणत्या पदावर झाली?<br>३) त्यानंतर झालेली नियुक्ती / पदोन्नती कोणत्या पदावर कधी कधी झाली, दिनांक व पदनाम, सेवा-पुस्तकातील नोंदीसहित.<br>४) सदर नियुक्ती ही पदोन्नतीने झाली की सरळसेवा भरतीने | |

| | | |
|---|---|---|
| | झाली? नियुक्ती करताना भरती प्रक्रिया राबविण्यात आली का?<br>५) नियुक्ती सरळसेवा भरती प्रक्रियेने करण्यात आली आहे का? नसल्यास सरळ सेवा भरतीने पद न भरल्याची कारणे.<br>६) एकाच संवर्गातून त्याच संवर्गात पदोन्नती देता येते का? नियुक्ती करताना प्रक्रिया राबविण्यात आली का?<br>७) एका संवर्गामधून (वर्ग-३) मधून दुसऱ्या संवर्गात (वर्ग-१) मध्ये परस्पर पदोन्नती देता येते का? याबाबत नियम काय आहेत?<br>८) सदर निर्णय कधी झाले व तसा निर्णय घेण्यामागील कारणे.<br>९) सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स बरोबर दुसरी कोण-कोणती समकक्ष पदे आहेत?<br>१०) शासन स्तरावर अशी पदे आहेत का? असल्यास त्यांना देण्यात येणारे वेतन व त्या पदासाठी असलेले निकष, शैक्षणिक, अनुभव पात्रता देण्यात यावी. शासन स्तरावर सदर पदांवर नियुक्ती कशी करण्यात येते?<br>११) शासन निर्णयात 'इतर समकक्ष पदांना १५,६००-३९,१०० (GP.5400) देण्यात यावे असा' उल्लेख दिसत नाही. तशा आशयाचा शासन निर्णय देण्यात यावा.<br>१२) प्रत्येक कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम सहित (सिस्टम ऑफिसर्स व इतर समकक्ष) सदर वेतनवाढ दिल्यास प्रत्येक वर्षी विद्यापीठावर येणारा आर्थिक भार किती असेल ? तसेच मागील दिनांकापासून (back dated) द्यावयाचे असल्यास किती आर्थिक भार विद्यापीठावर येईल?<br>१३) सदर १० पदांमधील ३ पदांचे वेतन १५,६००-३९,१०० व ग्रेड वेतन ५४०० कोणत्या आधारावर देण्यात आले? | |
| **आस्थापना विभाग १/३ यांनी केलेली कार्यवाही** | १) आस्थापना विभागाने पत्र क्र.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/२१२३ दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ नुसार विभागाकडून सदर बाबत कार्यवाही करण्यात येत असून कार्यवाही पूर्ण होताच कार्यवाही अहवाल देण्यात येईल. असे कळविण्यात आले आहे. | |
| **आस्थापना विभाग २/४ यांनी केलेली कार्यवाही** | २) पत्र क्र.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/२२९२ दि. ७ डिसेंबर, २०१८ नुसार सदर बाबत आस्थापना १/३ विभागाकडून माहिती मागविली त्या माहितीच्या अनुषंगाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/१८-१९/३२१५ दिनांक १ मार्च, २०१९ नुसार आस्थापनाने माहिती दिली आहे. (प्रत संलग्न) | |
| **बाब: ७** | **सर्व विद्याशाखांतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाना क्रीडा निधी (Annual Sports Contribution) ठरविणे बाबत.** | क्रिडा व शा.शि. विभाग |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, सर्व विद्या शाखातील संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यता प्राप्त संस्थांना क्रिडा निधी (Annual Sport Contribution) ठरविण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. क्रीडा समिती/१८ दि. ६ ऑगस्ट, २०१४ मध्ये अ.क्र. ४ ते ७ रद्द करून अ.क्र. १,२,३ मुद्यांचा समावेश करावा, तसेच प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे शारिरीक शिक्षण संचालक/ क्रिडा मार्गदर्शन यांची नेमणूक करण्यात यावी. अशी शिफारस मान्य करण्यात आली. त्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थांना सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | असाही ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/ संस्थांमधून क्रिडा निधीजमा झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय माहिती सादर करण्यात यावी. | |
| **क्रिडा व शारिरीक शिक्षण विभागाने केलेली कार्यवाही** | शारिरीक शिक्षण विभागाने पत्र क्र.क्रिडा/१७५५/२०१८ दिनांक २४ डिसेंबर, २०१८ नुसार सर्व विद्या शाखातील संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यता प्राप्त संस्थांना क्रिडा निधी (Annual Sport Contribution) बाबतचे सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्याबाबतचे पत्र मा. कुलसचिवांच्या स्वाक्षरीकरीता दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी पाठविण्यात आले आहे. (सदर पत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे.) परिपत्रक क्र.क्रिडा/७२/२०१८ दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी निर्गमित केले. तसेच पत्र क्र.क्रिडा/२०६५/२०१९ दिनांक २८ जानेवारी, २०१९ नुसार वार्षिक क्रिडा अंशदानाची यादी जोडली आहे. (६ ऑक्टोबर, २०१८ च्या कार्यवाही अहवालामध्ये यादी आहे. )सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षा पासून सर्व शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत आहे. या संदर्भात सविस्तर माहितीसाठी वित्त व लेखा आणि एम.के.सी.एल. यांच्याशी पत्र व्यवहार केला आहे. | |
| **बाब: ८** | **डॉ. एस. व्ही. रत्नपारखी, प्राध्यापक-नि-संचालक यांच्या सेवानिवृत्ती वयोमानाबाबत.** | शि. नि. व मा. विभाग(वि.शि.) |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, डॉ. एस. व्ही. रत्नपारखी, प्राध्यापक-नि-संचालक यांची बाब न्यायप्रविष्ठ (Sub-judice) असल्यामुळे सदर बाब विभागाकडे परत पाठविण्यात यावी. | |
| **शि. नि. व मा. विभाग (वि.शि.) विभागाने केलेली कार्यवाही** | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र.TAAS(UT)/ICD/2018-19/959 दि. १९ नोव्हेंबर, २०१८ नुसार सदर बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे दफ्तरी दाखल करण्यात आलेली आहे. असे कळविले आहे. | |
| **बाब: ९** | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (e) अन्वये "विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, संचालक,नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य यांच्या निवडीकरिता व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांची निवडसमितीवर नामनिर्देशित" करण्याबाबत...** | शि. नि. व मा. विभाग (वि.शि. ) |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (e) विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य यांच्या निवडीकरिता व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांची निवड समितीवर नामनिर्देशित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |

| | | |
|---|---|---|
| **शि. नि. व मा. विभाग (वि.शि.) विभागाने केलेली कार्यवाही** | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने पत्र क्र.TAAS(UT)/ICD/2018-19/959 दि. १९ नोव्हेंबर, २०१८ नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२)(e) नुसार विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. संचालक, क्रिडा व शारिरीक शिक्षण, संचालक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य यांची नियुक्ती कुलसचिवांच्या शे-यानुसार आस्थापना विभागा मार्फत होणार असल्याने सदर ठराव आस्थापना विभागाकडे वर्ग करण्यात आल्याचे पत्र सोबत जोडले आहे. कार्यवाही सुरू आहे. | |
| **आस्थापना १/३ विभागाने केलेली कार्यवाही** | अस्थापना विभागाचे पत्र क्र.ईएसटी/आयसीडी/२०१८-१९/३०६० दि. १४ फेब्रुवारी, २०१९ नुसार कार्यवाही अहवाल दिला आहे. | |
| **बाब: १०** | **विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील /महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत.** | निवडणूक विभाग |
| **ठराव** | असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना मानधन देण्याच्या प्रस्तावावर सखोल चर्चा करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला तसेच अतिकालिक भत्ता व सुट्टीच्या दिवशी काम केल्याने बदली रजा ही देण्यात आली असल्याने सदर बाब **अमान्य** करण्यात आली.<br><br>चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीबाबत नविन कायद्यानुसार निवडणुक नोंदणी शुल्काची आकारणी केली नाही त्यामुळे विद्यापीठाचे झालेले आर्थिक नुकसान तसेच विविध अभ्यास मंडळाच्या निवडणुका घेण्यात आलेल्या अडचणी व या अनुषंगाने प्राप्त झालेली निवेदने याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी व परिनियमाच्या अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतची डॉ. नरवडे यांनी केलेल्या मागणीची नोंद घेण्यात आली.<br><br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, मानधन देण्याबाबतची बाब ही निवडणूक सुरू होण्याअगोदर आणावी. | |
| **निवडणूक विभागाने केलेली कार्यवाही** | सदर बाबत सुधारीत ठराव व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ च्या बैठकीत पारित झाला आहे. त्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ च्या बैठकीत सदर बाब ठेवण्यात आली आहे. | |
| **बाब: ११** | **विद्वत परिषदेच्या दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र.४.१३ व ४.१४ वर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.** | विद्याविषयक प्राधिकरणे विभाग |
| **ठराव** | विद्वत परिषदेच्या दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र. ४.१३ व ४.१४ वर केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या. | |

| | | |
|---|---|---|
| **विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही** | विद्याविषयक प्राधिकरणे विभागाने पत्र क्र.AA/ICD/2018-19/608 दि. २४ ऑक्टोबर, २०१८ नुसार उपकुलसचिव, पदव्युत्तर व पदवी पूर्व विभाग यांना कार्यवाही करणेबाबत पत्र पाठविले आहे. तसेच परिपत्रक क्र.यु.जी./१३८ व १३९/१८-१९ दिनांक ३ जानेवारी, २०१९ नुसार परिपत्रक निर्गमित केले आहे. परिपत्रक सोबत जोडले आहे. | |
| **बाब: १२** | **Expansion of Governing Council, National Centre for Nanoscience and Nanotechnology, from 7 members to 10 Members.** | National Centre for Nanoscience and Nanotechnology |
| **ठराव** | It was resolved that permission for making governing council of National Center for Nano-science and Nano-technology more vibrant by including more experts and stake- holders permission for expansion of Governing Council from 7 members to 10 members , be granted. | |
| **नॅनो सायन्स ॲन्ड नॅनो टेक्नोलॉजी विभागाने केलेली कार्यवाही** | नॅनो सायन्स ॲन्ड नॅनो टेक्नोलॉजी या विभागाने गर्व्हनिंग कांऊसिलसाठी नावे देण्याबाबत मा. कुलगुरूना पत्र क्र. NCNNUM/679/2018 dt. 20 November, 2018 पाठविले त्या नुसार मा. कुलगुरूंनी नावास मंजूरी दिली आहे. | |
| **बाब: १३** | **Nominating members of the Governing Council of National Centre for Nanosciences & Nanotechnology, University of Mumbai (NCNNUM)** | National Centre for Nanoscience and Nanotechnology |
| **ठराव** | It was resolved that following two names (as per composition 3 and 4 of Governing Council ) as Members on the Governing Council of National Centre for Nano-sciences & Nano-technology, University of Mumbai nominated by the Management Council.<br>1) Dr. Anil Kakodkar.<br>2) Dr. Ashok Kolaskar. | |
| **नॅनो सायन्स ॲन्ड नॅनो टेक्नोलॉजी विभागाने केलेली कार्यवाही** | नॅनो सायन्स ॲन्ड नॅनो टेक्नोलॉजी या दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी डॉ. अनिल काकोडकर आणि डॉ. अशोक कोळसकर यांना पत्र पाठविले आहे. | |
| **बाब: १४** | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४७ (३) (घ) आणि (ङ) (च) मधील तरतुदीनुसार परीक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये व्यवस्थापन परिषदेने अधिष्ठात्या व्यतिरिक्त दोन प्राचार्य व विद्यापीठ विभागातील एक प्राध्यापक आणि विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्या खेरीज संलग्न महाविद्यालयातील एक अध्यापक नामनिर्देशित करण्याबाबत.** | निवडणूक विभाग |
| **ठराव** | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४७ (३) (घ) आणि (ङ) (च) मधील तरतुदीनुसार परीक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये व्यवस्थापन परिषदेने अधिष्ठात्या व्यतिरिक्त दोन प्राचार्य व विद्यापीठ विभागातील एक प्राध्यापक आणि विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्या खेरीज संलग्न महाविद्यालयातील | |

| | | |
|---|---|---|
| | एक अध्यापक नामनिर्देशित करण्याबाबत मा. कुलगुरूंना अधिकार प्रदान करण्यात आले.<br>मा. सदस्य श्री. प्रदीप सावंत यांनी डॉ. तुषार देसाई यांचे नाव सुचविले. डॉ. सांगुर्डे यांनी डॉ. के. वाय. राजपूत, थाडोमल सहानी महाविद्यालय व डॉ. भामरे यांनी प्रा. वैभव नरवडे यांचे नाव सुचविले. सदर नावाचा नामनिर्देशन करताना विचार करण्यात यावा, असे ठरले. | |
| **निवडणूक विभागाने केलेली कार्यवाही** | याबाबत निवडणूक विभागाने प्रशासनास टिप्पणी सादर केली आहे टिप्पणी क्र.नि.वि./आयसीडी/२०१८-१९/५१४ दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८. सदर बाबत निवडणूक विभागाने प्रशासनास पुन:श्च टिपणी सादर केली आहे, असे पत्र क्र. नि.वि. /आयसीडी/१८-१९/५९२ दिनांक २५ जानेवारी, २०१९ रोजी कळविले आहे. | |
| **बाबः १५** | **मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्याबाबत व इनक्युबेटी एन्ट्री व एक्सीट पॉलिसी आणि इनक्युबेशन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सेक्शन ८, कंपनी ॲक्ट (सुधारणा) २०१३ अन्वये गठीत करण्याबाबत.** | विद्याविषयक नियोजन व विकास विभाग/ /विद्यार्थी विकास विभाग |
| **ठराव** | मा. सदस्य श्री. प्रदीप सावंत यांनी मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्यात येणार याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन केले. मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्यास व इनक्युबेटी एन्ट्री व एक्सीट पॉलिसीबाबत अधिष्ठाता मंडळाला नियमावली बनविण्यास मान्यता देण्यात आली.<br>इनक्युबेशन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सेक्शन ८, कंपनी ॲक्ट (सुधारणा) २०१३ अतंर्गत गठीत करण्यास मान्यता देण्यात आली.<br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, सदर सेंटर स्थापन करण्यासाठी सुरूवातीस रू. ५ कोटी रूपयांची तरतुद विद्यापीठाच्या निधी मधून करण्यात यावी. इनक्यूबेशन सेंटर हे सुरूवातीला मुंबईत स्थापन करण्यात यावे व नंतर हळू-हळू रत्नागिरी व इतर उपकेंद्रात सुरू करण्यात यावे.<br>मुंबई विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ (मुंबई युनिर्व्हसिटी ॲल्युम्नी असोशिएशन) पुर्नजिवित करण्यात यावा व त्यांची इनक्युबेशन सेंटर बळकट करण्यासाठी मदत घ्यावी असेही चर्चेअंती ठरले. | |
| **विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने केलेली कार्यवाही** | महाराष्ट्र स्टेट ऑफ इनोव्हेशन सोसायटीतर्फे नवसंशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत (LOI) इरादापत्र प्राप्त झाले आहे. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य या पदासाठी जाहिरात देण्यात आलेली आहे व यु.जी.सी. कडे Innovation Council कडे नोंदणीसाठी अर्ज केला आहे. इनक्युबेशन व इन्वोव्हेशन सेंटर विद्यापीठात स्थापन करण्यात आले आहे. | |
| **विद्यार्थी विकास विभागाने केलेली कार्यवाही** | विद्यार्थी विकास विभागाने पत्र क्र.DSW/IB/ICD/2018-19/392 दि. १२ ऑक्टोबर, २०१८ नुसार मुंबई विद्यापीठ, माजी विद्यार्थी संघ पुर्नजिवित करण्याचे काम डॉ. स्मिता शुक्ला करत आहेत असे कळविले आहे. | |

| | | |
|---|---|---|
| बाब: १६ | **मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी विभागाला शैक्षणिक स्वायत्तता सातत्य देणेबाबतचा प्रस्ताव.** | विद्याविषयक नियोजन व विकास विभाग /Mumbai School of Eco. & Public Policy |
| ठराव | विद्वत परिषदेच्या दि. ८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीतील बाब क्र.७.१ अन्वये केलेल्या शिफारशी मान्य करण्यात येऊन मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी या विभागाला सन २०१६-१७ ते २०२०-२१ चे शैक्षणिक स्वायत्ततााबाबत सातत्य देण्यास मान्यता देण्यात आली. | |
| विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने केलेली कार्यवाही | विद्याविषयक नियोजन व विकास विभागाने पत्र क्र. APD/ICD/446/2018 दि. २० नोव्हेंबर, २०१८ अन्वये मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी या विभागाला शैक्षणिक स्वायत्तता देण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. | |
| बाब: १७ | **To nominate three members on the Board of Management of Mumbai School of Economics and Public Policy (Autonomous)** | Mumbai School of Economics and Public Policy |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसीच्या (स्वायत्तता), बोर्ड ऑफ मॅनेजमेंटवर तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी विभागाने केलेली कार्यवाही | मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी विभागाने बोर्ड ऑफ मॅनेजमेंटवर १. डॉ. विजय केळकर २. डॉ. अजित रानडे ३. विक्रम लिमये यांचे नामनिर्देशन केल्या बाबतचे पत्र पाठविले आहे. सविस्तर माहिती सोबत जोडली आहे. | |
| बाब: १८ | **Discussion and decision by the Management Council regarding cases of alleged plagiarism.** | Thesis |
| ठराव | यू.जी.सी चे क्र.F.1-18/2010(CPP-II) दि. २३ जुलै, २०१८ चे नोटिफिकेशन स्विकारण्यात येऊन महाविद्यालयांना परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. तसेच विद्यापीठ स्तरावर त्यानुसार समिती गठीत करण्यात यावी आणि सर्व प्रलंबित व भविष्यात येणारी प्रकरणे सदर समितीसमोर आवश्यक कार्यवाहीसाठी ठेवण्यात यावी. यू.जी.सी. नोटिफिकेशन प्रमाणे समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| प्रबंध विभागाने केलेली कार्यवाही | प्रबंध विभागाने पत्र क्र. आयसीडी/२०१८-१९/३५७९ दिनांक ५ नोव्हेंबर, २०१८ नुसार<br>१)क्र.Th./ICD/2018-19/3403 दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ च्या पत्रानुसार प्रोफेसर रविंद्र डी. कुलकर्णी, मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली "Institutional Academic Integrity Panel (IAIP)" समितीचे गठण करण्यात आले.<br>२)क्र.Th./ICD/2018-19/558 दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ च्या परिपत्राकानुसार संबंधित संशोधन केंद्राना "Institutional Academic Integrity Panel (IAIP)" गठण करण्याच्या सुचना देण्यात आल्या | |

| | | |
|---|---|---|
